दैनिक
# श्रमिक लोकराज्य

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

नांदेड । दैनिक । वर्ष 6 । अंक 289 । **सोमवार**, दि. 13 जुलै 2026 । RNI MAHMAR/2021/85782 । पाने 04 । किंमत 2 रूपये । ई-पेपर : www.shramiklokrajya.in

## एकघरी बंधारा दुरूस्तीतील कथित गैरव्यवहाराची चौकशी करा; अन्यथा 15 जुलैपासून उपोषणाचा इशारा

### जलसंधारण अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी; प्राजक्ता गुंडेकर यांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन



**या संदर्भात अधिक माहिती घेतली असता बंधारा दुरुस्तीचे काम आणखी होने बाकी असून, कोणत्या प्रकारचे बिले अदा करण्यात आलेली नाहीत. अशी माहिती संबंधित ठेकेदाराकडून देण्यात आली आहे.**

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**हिमायतनगर :** तालुक्यातील मौजे एकघरी येथील बंधारा दुरुस्तीच्या कामात कथित आर्थिक गैरव्यवहार व निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचा आरोप करत संबंधित जलसंधारण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी युवती सेना जिल्हा समन्वयक तथा ग्रामपंचायत सदस्या प्राजक्ता रामराव गुंडेकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, एकघरी येथील बंधारा दुरुस्तीसाठी सुमारे ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात बंधाऱ्यावरील काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, शासनाच्या निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. बांधाऱ्याची उंची वाढविण्यासाठी केवळ मतिमिश्रित पद्धतीने नियमांना बगल देऊन वरवरची कामे करून बंधाऱ्याची गुणवत्ता धोक्यात आनल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कारण सदर कामावर संबंधित लघु पाठबंधारे अधिकारी यांनी साधी भेट देखील दिली नाही. एव्हढेच नाहीतर डोळेझाकून संबंधित कामाची देयके देण्यात आली. या अनियमित कामाची चौकशी करावी अन्यथा १५ जुलै २०२६ पासून एकघरी बंधाऱ्यावर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा प्राजक्ता गुंडेकर यांनी दिला आहे. या निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड तसेच जलसंधारण अधिकारी (लघु पाटबंधारे विभाग), जिल्हा परिषद नांदेड यांनाही देण्यात आली आहे.


## जांबच्या शेतकऱ्यांसाठी गोदाम उभारणीचा मार्ग मोकळा? सहकार मंत्र्यांचे निधीचे आश्वासन

### वि.का.से. सोसायटीचे चेअरमन जीवनराव गोंड यांचा पुढाकार; शेतमालाच्या सुरक्षित साठवणुकीचा प्रश्न मंत्र्यांसमोर

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**जांब :** जांब परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतमालाची सुरक्षित साठवणूक व्हावी आणि योग्य सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी जांब येथे शेतमाल साठवणूक गोदाम उभारण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील हे जांब येथे एका कार्यक्रमानिमित्त आले असता, वि.का.से. सोसायटीचे चेअरमन जीवनराव गोंड व सोसायटीच्या सभासदांनी गोदाम बांधकामासाठी निधीची ठोस मागणी त्यांच्याकडे केली.

जांब व परिसरातील शेतकरी मोठ्या कष्टाने विविध पिकांचे उत्पादन घेतात. मात्र, शेतमालाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने अनेकदा शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते. बाजारभावाअभावी शेतमाल तातडीने विकण्याची वेळही शेतकऱ्यांवर येते. ही गंभीर बाब लक्षात घेऊन चेअरमन जीवनराव गोंड यांनी शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न थेट सहकार मंत्र्यांसमोर मांडला. 'जांब येथे शेतमाल साठवणूक गोदाम उभारण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा,' अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मागणीची सकारात्मक दखल घेत सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील यांनी गोदाम बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. मंत्र्यांच्या या आश्वासनामुळे



**शेतकरी हितासाठी पुढाकार; जांबच्या विकासाला नवी आशा गोदाम उभारणी झाल्यास शेतमालाची सुरक्षित साठवणूक, संभाव्य नुकसान टाळणे आणि योग्य बाजारभाव मिळेपर्यंत माल साठवून ठेवणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे. त्यामुळे ही मागणी जांब परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.**

जांब परिसरातील शेतकरी बांधवांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

यावेळी मुखेड तालुक्याचे माजी उपसभापती मनोज गोंड, जांबचे सरपंच वसंत गायकवाड, सूर्यकांत मोरे, श्रीकांत सूर्यवंशी, ज्ञानोबा कटाळे, इसुब कासार, भाजपचे युवा कार्यकर्ते राजन गोंड यांच्यासह सोसायटीचे सभासद, कार्यकर्ते, शेतकरी बांधव व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी हिताचा महत्त्वपूर्ण प्रश्न पुढे आणून गोदामासाठी निधीची मागणी केल्याबद्दल वि.का.से. सोसायटीचे चेअरमन जीवनराव गोंड व सर्व सभासदांच्या पुढाकाराचे परिसरातून कौतुक होत आहे. आता सहकार मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन जांबच्या शेतकऱ्यांसाठी गोदाम उभे राहणार का, याकडे शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

---

## महिलांना न्याय, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी सर्व विभागांमध्ये प्रभावी समन्वयाची गरज

### – राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर • महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचे निर्देश

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड, दि. 12 जुलै :** महिलांना न्याय, सुरक्षा व सक्षमीकरण प्रभावीपणे सुनिश्चित करण्यासाठी महिला व बाल विकास, पोलीस, विधी सेवा प्राधिकरण, आरोग्य, महसूल, ग्रामविकास तसेच अन्य संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. कार्यस्थळी महिलांना सुरक्षित, सन्मानजनक व भेदभावमुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पॉश (लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, 2013 अंतर्गत प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खासगी तसेच असंघटित क्षेत्रातील आस्थापनांमध्ये अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिले.

पॉश ॲक्ट अंतर्गत तक्रार निवारण समिती न स्थापन केलेल्या शासकीय व खाजगी आस्थापना यांना दंड ठोठावण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महिलाविषयक विविध विभागांच्या योजनांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, विधी सेवा प्राधिकारणाचे सचिव शरद देशपांडे, स्वीय सहाय्यक संतोष कुलकर्णी, महिला बाल विकास विभागाचे

**जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी समन्वयाने कार्य करून महिलांना वेळेत सुरक्षा, न्याय, माहिती, समुपदेशन, निवारा आणि हक्क उपलब्ध करून द्यावेत. तसेच पोक्सो प्रकरणांच्या सामाजिक परिणामांचा अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे आवश्यक असल्याचे अध्यक्षा विजया रहाटकर यांनी नमूद केले. बैठकीचा समारोप करताना त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्थानिक समित्यांची भूमिका अधिक प्रभावी करण्याबरोबरच जनजागृती, प्रशिक्षण आणि संवेदनशीलता निर्माण करण्यावर विशेष भर देण्याचे आवाहन केले. बैठकीनंतर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील हिरकणी कक्षाला भेट देवून पाहणी केली. आभार जिल्हा महिला बाल विकास अधिकारी गणेश वाघ यांनी मानले.**





उपमुख्यकार्यकारी अधिकारी थोरात, महिला बाल विकास अधिकारी गणेश वाघ, विविध विभागाचे अधिकारी, समित्यांचे सदस्य आदीची उपस्थिती होती. यावेळी बोलताना विजया रहाटकर म्हणाल्या की, केंद्र व राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना आणि कायदे लागू केले आहेत. महिलाविषयक योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय आवश्यक असून त्यांच्या अंमलबजावणीचे नियमित ऑडिट आणि डिजिटल मॉनिटरिंग केले गेले पाहिजे. महिलांना त्वरित न्याय मिळावा यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी त्रैमासिक संयुक्त आढावा बैठक घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदविणे, वेळेत आरोपपत्र दाखल करणे आणि पुढील कायदेशीर कार्यवाही प्रभावीपणे पूर्ण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस, संरक्षण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुपदेशक, वन स्टॉप सेंटर, विधी सेवा प्राधिकरण आणि मानसोपचार सेवा यांच्यात सुसूत्र समन्वय असावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

बँक सखी, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्था, महिला शेतकरी गट यांचा सहभाग वाढवून महिलाविषयक कायदे व योजनांची व्यापक जनजागृती करावी. प्रत्येक तालुक्यातील संरक्षण अधिकाऱ्यांसाठी तत्काळ स्वतंत्र कार्यालयीन व्यवस्था आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच महिला शेतकऱ्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र हेल्प डेस्क तातडीने सुरू करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सन २०३० पर्यंत बालविवाह पूर्णपणे थांबविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कठोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत बेटी बचाओ-बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, वन स्टॉप सेंटर, कामगार महिलांसाठी वसतिगृह, प्रधानमंत्री आवास योजना, राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (एनआरएलएम), मनरेगा, स्टँड-अप इंडिया, महिला किसान सक्षमीकरण, पॉश कायदा, शी-बॉक्स, जल जीवन मिशन आणि एकल महिलांचे सर्वेक्षण आदी विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यात संरक्षण अधिकाऱ्यांसाठी कार्यालयीन जागा उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्व कार्यालयांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यावर भर दिला जाईल, अशी ग्वाही दिली. महिला हेल्प डेस्क लवकरच सुरू करण्यात येईल तसेच बालविवाह आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. भरोसा सेल, ॲसिड हल्ला व पीडित नुकसानभरपाई योजना, पोक्सो कायद्याची अंमलबजावणी, पोलीस दीदी- पोलीस काका उपक्रम, दामिनी व चार्ली पथक, डायल ११२ सेवा, हुंडाबळी, बलात्कार, महिलांवरील अत्याचार आणि बेपत्ता प्रकरणांवरील कार्यवाही याबाबत सादरीकरण करण्यात आले.

## संपादकीय

# वावदूक आणि वानप्रस्थ



काही राजकीय भाष्यकारांनी अमेरिकी घटनेतील २५ व्या कलमाचा आधार घेत ट्रम्प यांच्या अधिकारांत कपात केली जावी, असे सुचवले आहे.

स्वत:च्या देशाचा प्रमुख आंतरराष्ट्रीय मंचावर जेव्हा टिंगलीचा विषय होतो, तेव्हा त्यास कसे सामोरे जावे? सदरहू प्रश्न अन्य देशांतील कोणा सुबुद्ध नागरिकांस पडला असेल/नसेल, पण जगातील सर्वात श्रीमंत, बलाढ्य अशा अमेरिका देशातील नागरिकांस नक्कीच भेडसावत असेल. अन्य देशांतील नागरिकांच्या भावनांकडे दुर्लक्ष करून अमेरिकनांस पडलेल्या या प्रश्नाची दखल घ्यावयाची याचे कारण हा प्रश्न जाहीर विचारण्याची हिंमत त्या देशातीलच अनेक संस्था, व्यक्ती यांनी दाखवली असून अशा निर्भयांची संख्या पुढच्या काळात वाढेल अशी चिन्हे दिसतात. म्हणजे; 'आमच्या अध्यक्षाने माती खाल्ली' अशी भावना त्याच देशात व्यक्त होत असल्याने त्यावर भाष्य करणे ओघाने आले. ते करण्याआधी टर्कीची राजधानी अंकारा येथे 'नाटो' (नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन) देशांच्या बैठकीत ट्रम्प यांनी काय केले त्याविषयी. आंतरराष्ट्रीय करार म्हणजे काही घरच्या कार्यातील जेवणावळीतील पदार्थांची यादी नव्हे जी वरचेवर बदलता येईल याचा विसर अमेरिका या जगातील एकमेव महासत्तेच्या प्रमुखांस 'नाटो' बैठकीत पडला असावा असे दिसते. या बैठकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबर झालेला शस्त्रसंधी रद्द करत असल्याचे विधान केले. एखादा करार घडतो अथवा रद्द केला जातो तेव्हा त्यामागे काही एक किमान गांभीर्य असणे अपेक्षित. तथापि ट्रम्प आणि गांभीर्य, पोक्तपणा वगैरेंची जन्मत:च ताटातूट झाली असावी. 'नाटो' देश प्रमुखांच्या साक्षीने त्यांनी हा करार रद्द करत असल्याचे विधान केले. ट्रम्प यांची कार्यशैली आणि कर्तृत्व लक्षात घेता तेथे जमलेल्या 'नाटो' समूहातील अन्य देशप्रमुखांस या विधानाचा काही धक्का बसला असेल असे वाटत नाही. विवेकाप्रमाणे काही नेत्यांच्या धक्का देण्याच्या क्षमतेचाही वयपरत्वे ऱ्हास होतो. ट्रम्प या अशांचे शिरोमणी. त्यांनी हा करार रद्द केल्याचे विधान केले पण ते लगेच पुढे "म्हणजे अमेरिका-इराण यांच्यात लगेच पुन्हा युद्ध सुरू होईल असे नाही", असेही म्हणाले. पाठोपाठ त्यांनी आपणास इराणी नेतृत्वाची किती घृणा आहे हेही सांगितले आणि आज मध्यरात्री इराणवर भीषण हल्ला होईल ही 'सुवार्ता'ही दिली. ट्रम्प यांच्या अन्य अनेक विधानांप्रमाणे ती खोटी ठरली. परंतु त्यांच्या या विधानानंतर इराण आणि अमेरिका यांची पुन्हा एकदा जुंपली आणि जगभरातील बाजार मटकन बसले, रुपया गडगडला आणि तेल महागले. तेव्हा अशा व्यक्तीचे आता करायचे तरी काय असा प्रश्न जगभरात अनेकांस पडला असणार. अर्थात असा प्रश्न ज्यांच्याबाबत पडू शकतो असे ट्रम्प एकटे नाहीत. तरीही इतरांकडे दुर्लक्ष करून ट्रम्प यांची दखल घ्यावी लागते कारण ते अमेरिकेचे अध्यक्ष आहेत. त्यांचे हे इराणविषयक विधान म्हणजे या विषयावरील आणखी एक कोलांटउडी. आता त्यांच्या अन्य अधिक धक्कादायक विधानांविषयी. ती अधिक काळजी वाढवणारी आहेत.

उदाहरणार्थ त्यांनी केलेला 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ जपान' हा उल्लेख. जपान या देशाचा आणि इस्लामी प्रजासत्ताकाचा संबंध काय? ट्रम्प यांच्या मनास असे काही शिवले नाही. त्यांनी जपान या आपल्या मित्रदेशास इस्लामी गटात ढकलून दिले. इतकेच नाही. तर 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ जपान'ने अमेरिकी विमानवाहू जहाजांवर १११ क्षेपणास्त्रे डागली असेही ट्रम्प म्हणाले. त्यांना अभिप्रेत होते इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण. त्यातील देशाच्या जागी इराण काढून त्यांनी तेथे जपान ठेवले. असे होऊनही ट्रम्प यांस आपण चुकलो याची जाणीवही झाली नाही. नंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी "तुम्हांस रशियाचे व्लादिमीर पुतिन यांना काही विचारायचे आहे काय", अशी पृच्छा केली. एरवी यात काही गैर वाटले नसते. पण अंकारा येथे ते वाटले कारण पुतिन हजरच नव्हते. कसे असणार? ही 'नाटो'ची बैठक होती. यात पंचाईत अशी की पुतिन यांच्याविषयी भाष्य करताना ते बोट दाखवत होते वोलोदमीर झेलेन्स्की यांच्याकडे. रशियाचे व्लादिमीर पुतिन आणि त्यांचे कट्टर प्रतिस्पर्धी वोलोदमीर झेलेन्स्की यांच्यात ट्रम्प यांची गल्लत झाली. त्यांच्या ती लक्षात आली आणि "मी फोन करून पुतिन यांना विचारीन असे मला म्हणायचे होते…" अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. तो अगदीच केविलवाणा ठरला.

याचे कारण ट्रम्प यांनी आपले पूर्वसुरी डेमॉक्रटिक पक्षाचे जो बायडेन यांच्यावर सतत केलेली अश्लाघ्य टीका. बायडेन कसे सतत पेंगत असतात आणि त्यांच्या डोक्यात काही शिरत नसते असे ट्रम्प यांचे म्हणणे. 'पेंगुळलेला जो' असे आपल्याच माजी अध्यक्षाचे वर्णन करण्यात ट्रम्प यांस काही गैर वाटले नव्हते. आता तीच आणि तशीच वेळ त्यांच्यावर येताना दिसते. 'द लिंकन प्रोजेक्ट' या अमेरिकी संस्थेने ट्रम्प यांच्या या विस्मरणावर तीव्र शब्दांत आक्षेप घेतला आणि त्यांच्या 'मेंदूचा आता चिखल झालाय' (हिज ब्रेन इज मुश) अशी टीका केली आहे. काही राजकीय भाष्यकारांनी ट्रम्प यांच्या अधिकारांत कपात केली जावी अशी मागणी करताना अमेरिकी घटनेतील २५ व्या कलमाचा आधार घेत हे केले जावे, असे सुचवले आहे. या कलमानुसार "बौद्धिक वा शारीरिकदृष्ट्या अपंगत्व" आलेल्या अध्यक्षाचा कार्यभार उपाध्यक्षाहाती सोपवता येतो. एकुणातच ट्रम्प आणि त्यांची बौद्धिक क्षमता (की तिचा अभाव?) हा मुद्दा अमेरिकेत तापू लागला असून त्यावरील चर्चेतून तेथील प्रामाणिक लोकशाही व्यवस्थेचा परिचय होतो. इतिहासात ट्रम्प यांच्याच पक्षाचे जॉर्ज बुश यांची शब्दघसरण हा चर्चेचा आणि टिंगलीचा विषय होता. 'एशिया-पॅसिफिक इकॉनॉमिक को-ऑपरेशन' म्हणजे 'एपेक'च्या कार्यक्रमात हजेरी लावताना भाषणात सतत 'ऑर्गनायझेशन ऑफ पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज' म्हणजे 'ओपेक' असा उल्लेख करणे, पॅलेस्टाईन माहीत नसणे इत्यादी अनेक भूलचुका बुश यांच्या नावे नोंदल्या गेल्या आहेत. 'द इकॉनॉमिस्ट'सारख्या भारदस्त आणि नेमस्त साप्ताहिकास बुश यांच्या या जाहीर कार्यक्रमातील डुलक्यांचे विशेष संकलन करावेसे वाटले यावरून त्या चुका किती गंभीर होत्या हे लक्षात यावे. पुढील काही दिवसांत वा महिन्यांत त्यात ट्रम्प यांच्या या अशा हास्यास्पद चुकांची भर पडू शकेल. ते ठीक. पण अशी व्यक्ती एकमेव महासत्तेच्या प्रमुखपदी आहे हे वास्तव झोप उडवणारे ठरते.

म्हणून इराण बेचिराख करीन असा इशारा दिल्यानंतर अवघ्या काही तासांत घूमजाव करत त्यांच्याशी तह करणे, तो केल्यानंतर पुन्हा युद्धाचे इशारे देणे, ते देताना असभ्य शब्दांचा वापर, दुसऱ्या एका सार्वभौम देशाची पंतप्रधान महिला छायाचित्रासाठी आपल्या मागे कशी लागली असे उगाचच ठोकून देणे इत्यादी वर्तनामुळे त्यांच्या मानसिक स्वास्थ्याबाबत चिंता व्यक्त होणे नैसर्गिक. 'सीएनएन'सारख्या वृत्तवाहिनीने ट्रम्प यांनी अवघ्या काही तासांत किती वेळा भूमिका बदलली आणि ती परस्परविरोधी कशी होती, याची वृत्तफीतच मध्यंतरी सादर केली. ट्रम्प खरे तर ८० वर्षांचे(च) आहेत आणि त्यांची शारीर प्रकृती उत्तम आहे. त्यांच्यापेक्षा वयाने मोठे असलेल्या अनेकांचे शहाणपण अजिबात सरकले नसल्याची उदाहरणेही आहेत. ट्रम्प यात नाहीत. परदेशी भूमीवर आपल्या देशप्रमुखाचे हसे होणे कोणालाही वेदनादायकच वाटेल. या वेदना अमेरिकनांसाठी अधिक. तो देश महासत्ता आहे. सर्वोच्च सत्तापदावरील व्यक्ती वावदूक झाली की वानप्रस्थास धाडणेच योग्य.

# बाबा... तुमच्या जाण्याने आयुष्य पोरकं झालं..!

**आज बाबांना जाऊन एक वर्ष पूर्ण झालं आहे. पण मन अजूनही त्यांचा निरोप स्वीकारायला तयार नाही. अजूनही वाटतं, बाबा कुठेतरी गावाला गेले आहेत. आता दार उघडेल... बाबा हाक मारतील... आणि नेहमीसारखे घरात येतील. प्रत्येक आवाजात त्यांचाच भास होतो. प्रत्येक आठवण डोळे पाणावून जाते.**

**बाबा, तुम्ही आम्हाला सोडून गेला असाल; पण तुमचे संस्कार, तुमचं प्रेम, तुमचा संघर्ष आणि तुमचं अपार ममत्व आमच्या प्रत्येक श्वासात जिवंत आहे. तुम्ही आम्हाला शिकवलंत की परिस्थिती कितीही कठीण असली तरी संघर्ष सोडायचा नाही. आज आम्ही जे काही आहोत, ते फक्त तुमच्या कष्टामुळे, त्यागामुळे आणि आशीर्वादामुळेच आहोत.**

जीवनात काही व्यक्ती अशा असतात, ज्यांच्या अस्तित्वामुळे घराला घरपण येतं. त्या व्यक्ती निघून गेल्यानंतर घर तसंच राहतं, माणसंही तशीच राहतात; पण त्या घरातील आनंद, सुरक्षिततेची भावना आणि जगण्याचा आधार कायमचा हरवून जातो. आमच्यासाठी ती व्यक्ती म्हणजे आमचे बाबा.

बाबांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे संघर्षाचा अखंड प्रवास होता. दारिद्र्य, हालअपेष्टा, उपासमार, कष्ट आणि दुःख यांनाच त्यांनी आयुष्यभर जवळ केले. अनेक वेळा डोळ्यांतील अश्रू पुसत, कोरड्या भाकरीचा घास खात त्यांनी दिवस काढले. स्वतःच्या दुःखाची कधी तक्रार केली नाही. कारण त्यांच्या डोळ्यांसमोर एकच स्वप्न होतं "माझी लेकरं शिकली पाहिजेत, उभी राहिली पाहिजेत आणि त्यांचं आयुष्य माझ्यासारखं नसावं." आमच्या शिक्षणासाठी त्यांनी कित्येकांकडून कर्ज घेतलं. स्वतःच्या गरजा, इच्छा आणि सुखाचा त्याग करून आमच्या भविष्याचा पाया रचला. आयुष्यभर संकटांशी दोन हात करत त्यांनी आम्हा भावंडांना योग्य संस्कार, योग्य दिशा आणि शिक्षण दिलं. त्यांच्या कष्टामुळेच आम्ही आज समाजात मानाने उभे आहोत.

हळूहळू परिस्थिती बदलत गेली. संघर्षाचे दिवस मागे पडत होते. घरात आनंदाचे क्षण परतले होते. आम्ही सर्वजण एकत्र हसत होतो. अनेक वर्षांच्या दुःखानंतर जणू सुखाचे दिवस आमच्या दारात आले होते. आम्हाला वाटलं, आता बाबांनी आयुष्यभर केलेल्या कष्टाचं फळ त्यांना मिळेल. आता ते शांतपणे, समाधानाने आणि आनंदाने जगतील.

परंतु नियतीला कदाचित हे मान्य नव्हतं.

बाबांची तब्येत अचानक बिघडू लागली. आम्ही क्षणाचाही विलंब न करता त्यांना दवाखान्यात दाखल केलं. अनेक तपासण्या झाल्या आणि डॉक्टरांनी सांगितलं की त्यांच्या किडन्या गंभीरपणे निकामी झाल्या आहेत. तो क्षण आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी दुर्दैवी ठरला.

त्यानंतर सुरू झाला उपचारांचा नवा संघर्ष. पैशाचा विचार न करता, स्वतःच्या सुखाचा विचार न करता आम्ही बाबांच्या उपचारासाठी सर्वस्व पणाला लावलं. त्यांचे डायलिसिस सुरू झाले. प्रत्येक उपचारात एकच आशा होती बाबा पुन्हा बरे होतील. मी अनेक नामांकित डॉक्टरांचा सल्ला घेतला. अनेक दवाखाने फिरलो. प्रत्येक ठिकाणी एकच प्रश्न विचारला "बाबांना कायमचं बरं करता येईल का?" पण जवळजवळ प्रत्येक डॉक्टराचं उत्तर एकच होतं. त्यांच्या वयामुळे किडनी प्रत्यारोपण शक्य नव्हतं. जर त्यांचं वय कमी असतं, तर आम्ही कुटुंबातील कुणीही स्वतःची एक किडनी देण्यासाठी क्षणाचाही विचार केला नसता. बाबांसाठी आमचं सर्वस्व अर्पण करण्याची तयारी होती; पण नियतीसमोर आमची इच्छा हतबल ठरली.

उपचार सुरूच राहिले. आम्ही सर्वजण बाबांच्या सेवेत होतो. माझा धाकटा भाऊ किरण याने तर स्वतःचं आयुष्यच बाबांच्या सेवेसाठी अर्पण केलं. एकही डायलिसिस चुकू दिलं नाही. दिवस-रात्र बाबांची सेवा, औषधं, काळजी आणि धीर देण्याचं काम त्याने अत्यंत निष्ठेने केलं.

नोकरीमुळे मला प्रत्येक क्षणी बाबांसोबत राहता आलं नाही, याची खंत आजही मनाला टोचते. पण मनाने मी प्रत्येक क्षण बाबांसोबतच होतो. उपचार, डॉक्टर, औषधं आणि आवश्यक ती प्रत्येक गोष्ट करण्यासाठी मी सतत प्रयत्न करत होतो.

आमची आई म्हणजे बाबांची खरी जीवनसाथी. तिने प्रत्येक क्षणी बाबांचा हात हातात धरून त्यांना धीर दिला. त्यांच्या मनातील भीती कमी करण्याचा प्रयत्न केला. "सगळं ठीक होईल" हा विश्वास तिने शेवटच्या क्षणापर्यंत जिवंत ठेवला. तिच्या डोळ्यांत अश्रू असले तरी बाबांसमोर ती कधीच खचली नाही.


परंतु देवाच्या निर्णयापुढे माणसाची इच्छा अपुरी पडते.

तो काळाकुट्ट दिवस उजाडला... आणि बाबांनी आमचा कायमचा निरोप घेतला.

त्या एका क्षणात आमच्या आयुष्यातील "बाबा" हा शब्दच जणू देवाने हिरावून घेतला. आम्ही खऱ्या अर्थाने पोरके झालो. डोक्यावरचा आधारवड कोसळला. जीवनात कितीही माणसं असली तरी "बाबा" या शब्दाची जागा कोणीच घेऊ शकत नाही.

- लेखन

**संभाजी नागनाथ होनराव**




**बाबा, तुम्ही या जगात नसाल; पण आमच्या प्रत्येक यशात तुमचा वाटा आहे, प्रत्येक आनंदात तुमचं स्मित आहे आणि प्रत्येक अश्रूमध्ये तुमची आठवण आहे. तुम्ही देहाने दूर गेला आहात; पण आमच्या हृदयात तुमचं स्थान कोणत्याही काळात, कोणत्याही परिस्थितीत कमी होणार नाही. तुमचा संघर्ष आमची प्रेरणा आहे, आणि तुमच्या आठवणी आमच्या आयुष्याची सर्वात मोठी संपत्ती आहेत.प्रथम पुण्यतिथीनिमित्त माझ्या दैवताला, माझ्या जीवनातील पहिल्या गुरूला, माझ्या आधारवडाला आणि माझ्या प्रेरणास्थानाला कोटी कोटी विनम्र अभिवादन.**

**बाबा... तुम्ही शरीराने आमच्यात नसाल, पण माझ्या प्रत्येक श्वासात, प्रत्येक विचारात, प्रत्येक संघर्षात आणि प्रत्येक यशात तुम्ही सदैव जिवंत राहाल.**

**संभाजी नागनाथ होनराव**

# मुंबईत पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांचा 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने गौरव

**निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि जनहिताच्या पत्रकारितेची दखल; 'टाईम्स न्यूज २४'च्या संपादकाचा मानाचा सन्मान**




श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुंबई/नांदेड** : जनहिताच्या प्रश्नांवर निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि सातत्यपूर्ण वृत्तांकन करणारे 'टाईम्स न्यूज २४' या वृत्तपोर्टलचे संपादक तथा पत्रकार किशोरकुमार शिवाजीराव वागदरीकर यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने रविवारी (१२ जुलै) मुंबई येथे सन्मानित करण्यात आले.

आर्यारवी एंटरटेनमेंट यांच्या वतीने आयोजित 'पहिला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाजसेवक पुरस्कार सोहळा–२०२६' या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉल येथे झालेल्या या सोहळ्यात आयोजक, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या हस्ते वागदरीकर यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी श्रीधर कीर, विसुभाऊ बापट, अरुण म्हात्रे, पंढरीनाथ तामोरे, गुरुनाथ तिरपनकर, सुनील शिर्के, वैभव कदम, कृष्णा काजरोळकर, ॲड. गौरव पाटील आणि अतुल तोडकरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार किशोर वागदरीकर यांच्या या यशाबद्दल पत्रकार, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सत्यमेव जयते

दि. १३ जुलै २०२६

जाहीर प्रगटन

तहसील कार्यालय, मुखेड

शासन स्तरावरून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी नवीन रास्तभाव दुकानांसाठी जाहीर प्रगटन काढण्यात आले आहे. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यात १२२ रास्तभाव दुकाने मंजूर करण्यात येणार आहेत. त्यापैकी मुखेड तालुक्यातील बोमनाळी, हातराळ व एकलारा येथे प्रत्येकी एक अशा तीन नवीन रास्तभाव दुकानांना मंजुरी देण्यात आली आहे.

सदर मंजूर महसुली गावांसाठी जाहीर प्रगटनानुसार अर्ज मागविण्यात आले असून, अर्ज करण्यासाठी खालील संस्थांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

- ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था
- नोंदणीकृत स्वयं-सहाय्यता बचत गट
- नोंदणीकृत सहकारी संस्था
- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणीकृत संस्था
- महिला स्वयं-सहाय्यता बचत गट व महिला सहकारी संस्था

शासन निर्णय दि. ०६ जुलै २०१७ नुसार वैयक्तिक स्वरूपातील अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदर अर्ज पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, मुखेड येथे उपलब्ध असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे.

तहसीलदार शंकर लाड व निरीक्षण अधिकारी (पुरवठा) निलेश रोहनकर मुखेड यांनी पात्र संस्था व अर्जदारांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

स्वाक्षरीत
(शंकर लाड)
तहसीलदार, मुखेड

स्वाक्षरीत
(नीलेश रोहनकर)
पुरवठा निरीक्षण
अधिकारी, मुखेड

# गोजेगाव नगरीचे भावी सरपंच

# संयम, प्रामाणिकपणा, सेवाभावी वृत्ती

## आ.डॉ.तुषार राठोड यांच्या माध्यमातून गावचा विकास करणारे युवा नेतृत्व

# अमोल पाटील गोजेगावकर

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...! 13 जुलै

**गावाच्या विकासासाठी पदाची नव्हे, तर सेवाभावी वृत्तीची आवश्यकता असते. समाजकारणाची आवड, सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण, शांत आणि संयमी स्वभाव तसेच प्रत्येक नागरिकाच्या अडचणीत धावून जाण्याची तयारी या गुणांच्या जोरावर अमोल पाटील गोजेगावकर यांनी गोजेगावच्या जनतेच्या मनात एक विश्वासार्ह युवा नेतृत्व म्हणून स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे आगामी काळात गावाच्या नेतृत्वासाठी त्यांच्याकडे आशेने पाहिले जात असून, अनेक ग्रामस्थ त्यांना भावी सरपंच म्हणून पाहत आहेत. आज दिनांक 13 जुलै 2026 रोजी त्यांचा वाढदिवस सर्वप्रथम त्यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.. !**

अमोल पाटील यांचा लोकांशी असलेला सातत्यपूर्ण संपर्क ही त्यांच्या कार्याची सर्वात मोठी ताकद मानली जाते. गावातील प्रत्येक वॉर्डातील नागरिकांशी ते सातत्याने संवाद साधतात. कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाली, तर त्या समस्येचे गांभीर्याने ऐकून संबंधित शासकीय विभागाशी संपर्क साधत ती मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे गावातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.

घरकुल योजनेअंतर्गत अनेक लाभार्थ्यांना कागदपत्रांची पूर्तता, मंजुरी किंवा इतर प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी अमोल पाटील यांनी अनेक गरजू कुटुंबांना वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांच्या कामांचा पाठपुरावा केला आहे. गरजूंच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी त्यांनी प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवत मदतीचा हात दिला आहे.

गावातील वीजपुरवठ्याच्या समस्या सोडविण्यासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

महावितरणच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून वीजपुरवठा सुरळीत व्हावा, ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती, नवीन जोडण्या किंवा इतर तांत्रिक अडचणी तातडीने दूर व्हाव्यात, यासाठी ते पुढाकार घेत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

शुद्ध पिण्याचे पाणी, दर्जेदार रस्ते, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि गावाचा सर्वांगीण विकास हे त्यांच्या कार्याचे प्रमुख ध्येय आहे. गाव स्वच्छ, सुंदर आणि हरित व्हावे, नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात आणि विकासाची गती वाढावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

सामाजिक कार्यातही अमोल पाटील नेहमी अग्रेसर राहिले आहेत. गावातील लग्नसमारंभ, वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, रक्तदान शिबिरे, शैक्षणिक कार्यक्रम तसेच गरजू नागरिकांच्या मदतीसाठी ते नेहमी उपस्थित असतात.

पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, न्यायालय किंवा इतर शासकीय कार्यालयांतील कामांसाठी नागरिकांना मार्गदर्शन करून त्यांची कामे सुलभ करण्यासाठी ते नेहमी पुढाकार घेतात.

धार्मिक क्षेत्रातही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. श्री स्वामी समर्थांचे निस्सीम भक्त म्हणून त्यांची ओळख असून, गणेशोत्सव, दुर्गोत्सव, रामजन्मोत्सव तसेच गावातील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

समाजात बंधुभाव, एकोपा आणि सामाजिक सलोखा टिकून राहावा, यासाठी ते सातत्याने कार्यरत असतात.







युवकांच्या प्रश्नांची त्यांना विशेष जाण आहे. शिक्षण, रोजगार, क्रीडा, स्पर्धा परीक्षा आणि सामाजिक सहभाग यांसाठी युवकांना प्रोत्साहन देण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटांना प्रोत्साहन, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि महिलांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेणे, यावरही त्यांचा भर आहे.गोजेगावच्या विकासासाठी आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या माध्यमातून सुमारे एक कोटी रुपयांच्या विकासकामांचा निधी मंजूर करून आणण्यासाठी, तसेच धीरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांचा पाठपुरावा करण्यासाठी अमोल पाटील सातत्याने प्रयत्नशील आहेत. विकासकामे गतीने पूर्ण व्हावीत आणि गावातील प्रत्येक नागरिकाला त्याचा लाभ मिळावा, यासाठी ते प्रशासनाशी समन्वय साधत काम करत आहेत.

**संयम, प्रामाणिकपणा, सर्वांना समान वागणूक देण्याची वृत्ती, सेवाभाव आणि विकासाचा स्पष्ट दृष्टिकोन यामुळे अमोल पाटील गोजेगावकर यांनी गोजेगावच्या जनतेच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली आहे. पद नसतानाही समाजकारणातून लोकांची सेवा करणाऱ्या या युवा नेतृत्वाकडून गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात असून, गोजेगावच्या जनतेच्या मनातील भावी सरपंच म्हणून त्यांचे नाव विश्वासाने घेतले जात आहे. पुन्हा एकदा त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांना उदंड आयुष्य लाभो आगामी काळात त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होवो ह्या सदिच्छा...!**

- लेखन
**अमोल पाटील गोजेगांवर**
मित्र परिवार



हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व **संपादक डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **गजानन केशवराव काळे** यांच्या **तेजस्विनी ऑफसेट प्रिंटर्स प्लॉट नं. डी-४१, साई स्मरण ऑइल इंडस्ट्रीज समोर, आर.टी.ओ. रोड, एमआयडीसी नांदेड - 431604** येथे प्रकाशित केले. E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya**, Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **GAJANAN KESHAVRAO KALE.** Printed at **TEJASWINI OFFSET PRINTERSPlot No. D-41, Opp. Sai Smaran Oil Industries R.T.O Road, MIDC Nanded, (Maharashtra) - 431604 M.S.** & Published Near AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715
Email: shramiklokrajya@gmail.com

# सत्य, निर्भीड आणि समाजभान जपणारे

## बुद्ध-फुले-शाहू -आंबेडकर या महामानवांच्या विचारांनी प्रेरित होवून ज्योत पेटवणारे

## बहुजन चळवळीचा आवाज

# पत्रकार भारत सोनकांबळे

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..! १३ जुलै

**बुद्ध-फुले-शाहू -आंबेडकर या महामानवांच्या समतेच्या, न्यायाच्या आणि परिवर्तनाच्या विचारांनी प्रेरित होवून समाजात जागृतीची ज्योत पेटवणारे, बहुजन चळवळीतील अभ्यासू संयमी संघर्ष योध्दा युवा नेतृत्व, तसेच निर्भीड पत्रकार म्हणून ओळख निर्माण करणारे पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर आज दिनांक 13 जुलै 2026 रोजी पत्रकार भारत सोनकांबळे**





माजी तालुकाध्यक्ष तथा प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे नांदेड जिल्हाकार्याध्यक्ष तथा रमाई फाऊंडेशन मौजे बेटमोगराचे सचिव



**यांचा वाढदिवस सर्वप्रथम त्यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा..!**

पत्रकारिता ही समाजाचा आरसा मानली जाते. समाजातील प्रश्नांवर निर्भीडपणे प्रकाश टाकत सकारात्मक दृष्टीकोनातून सत्य मांडण्याचे कार्य पत्रकार करत असतात याच पत्रकारिता क्षेत्रातील व सामाजिक चळवळीतील एक तरुण तडफदार व्यक्तिमत्व आणि निर्भीड पत्रकार म्हणून ओळख असलेले पत्रकार संघाचे

भारत सोनकांबळे बेटमोगरेकर. मुखेड तालुक्यातील बेटमोगरा गावचे निर्भीड पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर (बेटमोगरा ता.मुखेड जि.नांदेड) यांचा आज दि.१३ जुलै २०२६ रोजी वाढदिवस आहे. पत्रकार भारत सोनकांबळे हे आपल्या परखड,अभ्यासपूर्ण आणि निर्भीड लिखाणासाठी ओळखले जातात. सामाजिक प्रश्न, जनतेच्या अडचणी आणि विविध घडामोडींवर त्यांनी सातत्याने प्रभावी लेखन करत पत्रकारितेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली आहे. त्यांच्या लेखणीमुळे अनेक सामाजिक विषयांना वाचा फुटली असून समाजात जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. वंचित, शोषित आणि



अन्यायग्रस्त व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सन २०२१ त्यागमूर्ती माता रमाई





भीमराव आंबेडकर स्मारक समिती वरळी मुंबई च्या वतीने त्यांना "तुफानातील दिवे" हा मानाचा सन्मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पत्रकार भारत सोनकांबळे हे एक असे व्यक्तिमत्व आहे जे दुसऱ्याच्या हिताचा विचार करणे, हास्य खुलवणे आणि समाजाच्या एकूण आरोग्य आणि सुसंस्कृततेत सातत्याने भर घालते.

सर्वसामान्यांच्या मनाचा वेध घेणारे, सत्य, निर्भीड आणि समाजभान जपणारे, वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तीबरोबर मैत्रीपूर्ण संबंध असणारे मुखेड तालुक्यातील निर्भीड पत्रकार म्हणून भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांची ओळख तथा ख्याती आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित, वंचित, पाणीटंचाई, आरोग्य, रस्ते, वीज, शिक्षण, पाणी या मूलभूत समस्यांची जाण असल्याने त्यांनी सातत्याने लेखणीच्या माध्यमातून या सर्व प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. शहरकेंद्री पत्रकारितेच्या पलीकडे जाऊन गावगाड्यातील वास्तव मांडणे ही त्यांच्या पत्रकारितेची महत्त्वाची ओळख आहे.

ग्रामीण भागात होणारे सण, सोहळे, उत्सव,

**अल्पावधीतच त्यांनी पत्रकारितेमध्ये आपले नावलौकिक केले असून त्यांच्या सर्वंकष पत्रकारितेला माझा सलाम आहे. आज दि.१३ जुलै (१३-७)पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांचा वाढदिवस आहे. भारतजी सोनकांबळे आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. तुमच्या लेखणीला बळ यावे, तसेच पत्रकारितेत उत्तरोत्तर प्रगती व्हावी. पुढील आयुष्य आपले सुखाचे समाधानाचे भरभराटी जावो,अशी मी मनोकामना करतो व मनःपूर्वक शुभेच्छा देतो...**

**राजकीय क्षेत्रातील सत्तेचा गैरवापर लोकशाहीची पायमल्ली यावर ते प्रखडपणे व प्रखर शब्दात आपले मत मांडत असतात. कोणाच्याही दबावाला बळी न पडता सत्य मांडण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली आहे. सत्ताधाऱ्यांपेक्षा सामान्य नागरिकांच्या बाजूने उभे राहून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक या सर्व समस्यांची सोडवणूक त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सातत्याने केल्याचे दिसून येते. तथागत भगवान गौतम बुद्ध, चक्रवर्ती राजा सम्राट अशोक, संत कबीर,महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न,महामानव,भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या लेखणी मधून दिसून येतो.**






यात्रा, धार्मिक कार्यक्रम यांचे वृत्तांकन करून प्रभावीपणे दैनिकात मांडण्याचे काम सातत्याने पत्रकार भारत सोनकांबळे हे करत असतात. ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न हे धोरणकर्त्यापर्यंत पोहोचवण्याचे काम प्रभावीपणे व प्रामाणिकपणे ते सातत्याने करताना दिसतात. त्यांच्या बाबतीत महत्त्वाचे म्हणजे ते आत एक व बाहेर एक असे कधी वागत नाहीत. त्यांच्या पोटात जे असते तेच ओठात येते आणि लेखणीच्या माध्यमातून ते कागदावर प्रगट होते. ते पत्रकारिते बरोबरच समाजसेवेचेही काम करतात. पोलीस स्टेशन, दवाखाना, पंचायत समिती, तहसील या ठिकाणी कामानिमित्त येणाऱ्या प्रत्येक समाजातील गोरगरीब, वंचित, दलित, उपेक्षित लोकांना अडीअडचणी नुसार सर्वतोपरी सातत्याने मदत करतात.



**लेखन - ॲड.रणजीत विठ्ठलराव जामखेडकर**
**(जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय नांदेड)**
**मो. क्र. 9665758022, 8806642550**